ई-मेल : srpfgr2@rediffmail.com
दुरध्वनी क्र. ०२०- २९५११०९१
ISO९००१ : २०१५ मानांकन प्राप्त गट

**महाराष्ट्र शासन**
**समादेशक**
**राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २ पुणे**

**जा.क्र.:- आशा -१/ सपोशि भरती सन २०२२-२३ / नियुक्ती / २०२४ / ७६३७** **पुणे, दिनांक :- १५/१०/२०२४**

**विषय :- सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्ती बाबत . . .**

****

**आ_दे_श :-**

राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०२ पुणे येथील पोलीस गट मुख्यालयामध्ये आयोजित केलेल्या सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३ प्रक्रियेमध्ये गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारापैकी जे उमेदवार पुर्व चारित्र्य व चारित्र्य पडताळणीमध्ये तसेच वैद्यकिय तपासणीमध्ये पात्र ठरलेले आहेत. प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / पोलीस पाल्य /होमगार्ड / खेळाडु / माजी सैनिक या समांतर आरक्षामध्ये निवड झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांची समांतर आरक्षणाच्या प्रमाणपत्राबाबतची पडताळणी सत्यता संबंधित कार्यालयाकडुन या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. अशा खालील नमुद उमेदवारांची **गुरुवार दिनांक -१७.१०.२०२४** पासुन महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन ) नियम- २०१९ अन्वये वेतनबॅन्ड एस-७ (रु.२१७००-६९१००) या वेतनश्रेणीमध्ये रुपये २१७०० /- या वेतनावर **सशस्त्र पोलीस शिपाई (गट-क) या पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधिन राहुन नियुक्ती करण्यात** येत आहे. त्यांना हजर झालेल्या दिनांकापासुन वर नमुद वेतनश्रेणी व त्याखेरीज महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेले सर्व भत्ते मिळतील. त्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेप्रमाणे त्यांना बक्कल नंबर देण्यात येत आहेत.

**खुल्या प्रवर्गातुन (OPEN) मधुन निवड झालेले उमेदवार**

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नाव | जन्मदिनांक | जात | प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९२०७ | अजित मधूकर यादव | १८.०६.१९८४ | मराठा | SEBC | Ex-Serviceman | १०५३ |
| २ | १९२६० | आकाश अशोक थोरात | ०४.१०.१९९८ | मराठा | SEBC | - | १०५५ |
| ३ | १७४४१ | राहुल दत्तात्रय पवार | ०९.०१.१९९५ | वडार | VJ-A | Sportsman | १०५७ |
| ४ | ६७३५ | गोविंद बालाजी लिंबोळे | ११.१२.२००३ | वडार | VJ-A | - | १०५९ |
| ५ | १७९१३ | आशिषकुमार समाधान सपकाळे | १६.०१.२००२ | कोळी | SBC | Sportsman | १०६० |
| ६ | १४८३५ | हर्षद बाळासाहेब मुटकुळे | ०८.०८.२००३ | कुणबी | OBC | - | १०७३ |
| ७ | ५३२९ | प्रणव महेश शिंदे | 06-04-2002 | कुंभार | OBC | - | १०८५ |

**खुल्या प्रवर्गातुन (VJ-A) मधुन निवड झालेले उमेदवार**

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नाव | जन्मदिनांक | जात | प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६२५१ | आदिनाथ एकनाथ लष्कर | ०७.०९.१९९९ | वडार | VJ-A | - | १०५१ |

## अनुसुचित जाती प्रवर्गातुन (SC) मधुन निवड झालेले उमेदवार

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नाव | जन्मदिनांक | जात | प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३१२० | महेश किशोर कांबळे | १९.०५.२००२ | महार | SC | - | १०६१ |
| २ | ६५२७ | सचिन शहाजी आवटे | ०५.१०.२००३ | होलार | SC | - | १०६२ |

## सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातुन (SEBC) मधुन निवड झालेले उमेदवार

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नाव | जन्मदिनांक | जात | प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९२५९ | प्रज्वल अनिल थोरात | २४.०२.२००४ | मराठा | SEBC | - | १०६३ |
| २ | १७९०२ | पवन बाळकृष्ण करांडे | ११.१०.१९९९ | मराठा | SEBC | Sportsman | १०६४ |
| ३ | १७३०४ | अनिकेत शंकर पाटील | ३१.०५.२००३ | मराठा | SEBC | Sportsman | १०६५ |
| ४ | १२८६८ | सागर उर्फ अक्षय अशोक पाटील | २१.१०.१९९९ | मराठा | SEBC | - | १०६६ |
| ५ | १७९३० | सागर सुरेश जेधे | १५.०३.१९९५ | मराठा | SEBC | - | १०६७ |

## आर्थिक दृष्ट्या दुर्बल प्रवर्गातुन (EWS) मधुन निवड झालेले उमेदवार

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नाव | जन्मदिनांक | जात | प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७८५० | फैजान खा मेहमुद खा | ०४.०७.२००२ | मुस्लीम | EWS | Sportsman | १०६८ |
| २ | २४३८ | आकाश ईश्वर वाकडे | ०२.०४.२००० | लिंगायत | EWS | Earthquake Affected | १०७० |

## इतर मागास प्रवर्गातुन (OBC) मधुन निवड झालेले उमेदवार

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नाव | जन्मदिनांक | जात | प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८१७५ | सुरज शंकर करपे | २३.०५.२००१ | कुणबी | OBC | Earthquake Affected | १०७२ |
| २ | १७५१२ | पृथ्वीराज संजय नाळे | २१.१०.२००३ | कुणबी | OBC | Sportsman | १०७४ |

## अनुसुचित जमाती प्रवर्गातुन (ST) मधुन निवड झालेले उमेदवार

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नाव | जन्मदिनांक | जात | प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९०५१ | दिपक श्रीराम गव्हाळे | २६.१२.१९९९ | अंध | ST | - | १०७५ |
| २ | १७१९८ | हेमराज मोतिराम गायकवाड | २५.१०.२००० | कोकणा | ST | Sportsman | १०७७ |
| ३ | ८३१९ | कमलेश हराजी निमला | २४.०२.२००१ | वारली | ST | | १०८० |

## भज-क प्रवर्गातुन (NT-C) मधुन निवड झालेले उमेदवार

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नाव | जन्मदिनांक | जात | प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९२१८ | ईश्वर सुभाष पेंढारकर | २९.०७.१९८५ | धनगर | NT-C | Ex-Serviceman | १०८४ |

## वर नमुद उमेदवारांची खालील अटीवर नेमणुक करण्यात येत आहे :-

- वर नमुद नियुक्त केलेल्या नवप्रविष्ठ सशस्त्र पोलीस शिपाई यांना राज्य राखीव पोलीस बल कायदा १९५१ व राज्य राखीव पोलीस बल नियम १९५९ मधील सर्व कायेदशीर तरतुदी लागु होतील.

- '' ०१ एप्रिल २००५ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन '' राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (National Pension Scheme ) लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण ) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही. '' ( शासन निर्णय क्र.अनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५) तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४, दि.३१.०३.२०२३ अन्वये मुद्दा क्र.६ मध्ये नमुद प्रमाणे या पुढे शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयाप्रमाणे विकल्प शासन सेवेत नियुक्ती झाल्यावर आठ दिवसांच्या आंत सादर करणे आवश्यक राहिल.

- संबंधित उमेदवारास नेमणुकीच्या ठिकाणी कर्तव्यार्थ हजर होणेसाठी होणारा प्रवास खर्च त्यांना स्वतः सोसावा लागेल.

- सदर नवप्रविष्ठ सशस्त्र पोलीस शिपाई यांना रु.५००० /- इतका मेस ॲडव्हान्स म्हणुन द्यावा लागेल.

- वर नमुद सर्व उमेदवारांची नेमणुक वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र, पुर्व चारित्र्य व चारित्र्य पडताळणी तसेच समांतर आरक्षण प्रमाणपत्र पात्र अहवालानुसार करण्यात आलेली आहे.

- वर नमुद सर्व उमेदवारांची नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या अधिकार कार्यक्षेत्रातील कोणत्याही कंपनीत बदली होवु शकेल.

- प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवार विनापरवाना गैरहजर / भगोडा राहिल्यास, सदर उमेदवारास कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना नोटीस न देता सेवेतुन कमी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

- वरील सर्व उमेदवार यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ०३ वर्षात सशस्त्र पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास व सदर पदावरुन कार्यमुक्त करण्याची विनंती केल्यास त्यांच्या प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च,तसेच त्यांना अदा केलेले वेतन भत्यासहित वसुल करण्यात येईल.

- सशस्त्र पोलीस शिपाई या पदावर नेमणुक झालेल्या व्यक्तीस मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळाली नाही तर मराठी व हिंदी भाषा परिक्षा या संबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हावे लागेल.

- वर नमुद सर्व उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT / CCC परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे किंवा सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत पुढील वेतनवाढीकरिता सादर करणे आवश्यक आहे.

- तात्पुरते स्वरुपात सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्त केल्याने सेवाजेष्ठता ही सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना दिनांक २१ जुन २०२१ मधील क्र.३ (२) (ब) (१) मधील तरतुदीनुसार गुणवत्तेनुसार निश्चित करण्यात येईल.

- राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई पदावर उमेदवारास ज्या राज्य राखीव पोलीस बल गटामध्ये नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्या गटामध्ये ०५ वर्ष सेवा कालावधी पुर्ण झाल्यानंतर इतर गटामध्ये बदली होण्यास पात्र असेल तसेच शासन निर्णय गृहविभाग शुध्दीपत्रक क्र. पीएमएन-०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ ब, दिनांक २१.१०.२०१६ आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये निर्धारित केलेल्या अटी शर्ती व तरतुदीनुसार सेवाजेष्ठताप्रमाणे जिल्हा पोलीस दलामध्ये बदली होण्यास पात्र असेल.

- सशस्त्र  पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबंधित परिक्षा चार संधीमध्ये  उत्तीर्ण व्हावे लागेल, जर चार संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल, या कालावधीत वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

- सशस्त्र पोलीस शिपाई या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, म.ना.से.(शिक्षा व अपील) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी  विहित केलेले अन्य नियम लागु होतील.

- तीन वर्षाचा अखंड सेवा कालावधी पुर्ण होईपर्यत मध्यतंरीच्या कालावधी उमेदवारांची शिस्त, वर्तणुक व कामगिरी असमाधानकारक आढळुन आल्यास नियुक्ती अधिकारी अशा उमेदवारांची सशस्त्र पोलीस शिपाई या पदावरील सेवा कोणतेही कारण न दाखवता केव्हाही समाप्त करु शकतील, वरील बाबी समाधानकारक आढळुन आल्यास उमेदवार कायमपणाच्या फायद्याचे प्रमाणपत्र देण्यास पात्र ठरतील.

- वर नमुद उमेदवारांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जात प्रवर्गाच्या आरक्षित पदातुन सशस्त्र पोलीस शिपाई पदी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यांनी त्यांचे जाती दावा पडताळणीचे जात वैधता प्रमाणपत्र हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन ०६ महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहुन त्यांना सशस्त्र पोलीस शिपाई पदी नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यांनी त्यांच्या जातीचा दावा वैध असलेचे जात वैधता विहित मुदतीत सादर न केल्यास किंवा त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास त्यांना कोणतीही पुर्वसुचना न देता महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागासगर्व ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन ) अधिनियम,२००० मधील कलम १० च्या तरतुदीनुसार त्यांना सेवेतुन तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

- नवप्रविष्ठ सशस्त्र पोलीस शिपाई यांना महाराष्ट्र राज्यात व गडचिरोली, गोंदिया,चंद्रपुर इ.नक्षलग्रस्त भागात तसेच दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्याबाहेर देशभरात कोठेही कर्तव्यासाठी पाठविण्यात येईल, दिलेले कर्तव्य नाकारणार नाहीत.

- नवप्रविष्ठ सशस्त्र पोलीस शिपाई हे **गुरुवार दिनांक - १७.१०.२०२४** रोजी कर्तव्यावर हजर होतील, जे उमेदवार विहित मुदतीत कर्तव्यावर हजर होणार नाहीत, त्यांची  निवड रद्द करण्यात येईल.

***नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन***

**( नम्रता पाटील )**
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गटक्र. २ पुणे

**प्रति,**

संबधित सर्व उमदेवार- समक्ष / ई-मेलव्दारे

**मार्फतीने,**

**स्थाईक कंपनी नायक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२ पुणे.**

२/- वर नमुद उमेदवारांना आदेशाची प्रत अदा करुन मुळ आदेशाच्या प्रतीवर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी स्वाक्षरी घेवुन मुळ प्रत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

३/- वरील उमेदवारांचे प्रशिक्षण पुर्ण होईपर्यत स्थाईक कंपनीमध्ये नेमणुक करण्यात येत असुन, प्रशिक्षण पुर्ण होताच त्यांना इतर संचार कंपनीमध्ये नेमणुक देण्यात येईल. सदर उमेदवाराकडुन रु.५००० /- इतका मेस ॲडव्हॉन्स म्हणुन घेण्यात यावा. तसेच नप्रपोशि हजर झाल्यानंतर त्यांचा हजर दिनांक नामावलीसह या कार्यालयास सादर करावा.

४/- शासन अधिसुचनेनुसार लहान कुंटुंबाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहिल. अधिसुचनेतील नियम ४अ नुसार हयात मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.०३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेला मुलामुळे अनर्ह करण्यात पात्र राहिल. सदरचे प्रमाणपत्र घेवुन या कार्यालयास सादर करावे.

५/- कंपनी नायक यांनी नप्रपोशि यांचे वेतनासाठी बॅक खाते उघडावे तसेच नवीन अंशदान पेन्शन योजनेचे फॉर्म व नामनिर्देशन फॉर्म भरुन त्याबाबतची कार्यवाही पुर्ण करुन घ्यावी.

**प्रत,**

**पोलीस निरीक्षक, गट मुख्यालय, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२ पुणे.**

२/- वर नमुद उमेदवारांना सरकारी सरंजाम अदा करुन पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**लेखा शाखा, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२ पुणे**

२/- नमुद उमेदवारांची नवीन पारिभाषीत अंशदान निवृत्ती योजना अंतर्गत विहित नमुन्यातील फॉर्म भरुन घ्यावे व त्यांचे सेवार्थ मधील वेतनाबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**प्रत कार्यवाही करिता,**

पोलीस लेखापाल / गट राजपत्र / प्रलि.आस्था / पत्रव्यवहार शाखा / आशा-२,३,४ / नियंत्रण कक्ष, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२ पुणे

२/- नियंत्रण कक्ष यांनी नमुद उमेदवारांना सोबत येताना आधार कार्ड, पॅनकार्ड, १० फोटो, मेस अग्रीम करिता रु.५००० /-, लाईट बेडींग व जात पडताळणी करिता आवश्यक सर्व कागदपत्रे घेवुन येणेबाबत सुचित करावे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर,**

मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मा. अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे परिक्षेत्र पुणे.

**प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,**

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई ( लक्षवेध-संगणक कक्ष )

२/- नमुद उमेदवारांच्या नियुक्ती आदेशाची प्रत महाराष्ट्र पोलीस वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.